# प्रेसनोट दि. १०/०७/२०२०

## ०७ वर्षे पोलीसांना गुंगारा देवून लपून राहणाऱ्या गुन्हेगाराच्या गुन्हे शाखा, युनिट ५ ने आवळल्या मुसक्या

मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड श्री संदिप बिष्णोई सो यांनी राबविलेल्या पाहीजे फरारी मोहीमे अंतर्गत श्री. बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड यांनी पाहीजे फरारी आरोपी शोधणेकरीता गुन्हे शाखा युनिट ५ कडील अधिकारी व कर्मचारी यांना आदेशीत करुन सुचना दिल्या होत्या. आदेशाप्रमाणे कारवाई करीत असताना गुन्हे शाखेकडील **पोलीस कर्मचारी सावन राठोड** यांना बातमीदारा मार्फत माहीती मिळाली की, **देहूरोड पोलीस स्टेशन गु.र.नं. ४७/२०१३ भारतीय दंड विधान कलम ३९९, ४०२** या गुन्हयामध्ये निष्पन्न असलेला परंतु गेल्या ०७ वर्षापासुन पोलीसांना गुंगारा देवुन लपुन राहणारा आरोपी नामे दादा उर्फ दाद्या घनवट हा त्याचे घरी भिमशक्ती नगर, ताम्हाणेवस्ती, चिखली पुणे येथे येणार असल्याची माहिती मिळाली. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदरची बातमीचा आशय श्री.बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा युनिट ५ यांना कळविला असता त्यांनी गुन्हे शाखा युनिट ५ कडील सपोनि राम गोमारे व पोलीस कर्मचारी सावन राठोड, धनराज किरनाळे, संदिप ठाकरे व दत्तात्रय बनसुडे यांचे एक शोध पथक तयार करुन त्यांना योग्य त्या सुचना व मार्गदर्शन करुन कारवाई करणेबाबत आदेशीत केले.

त्यावर सदरचे शोध पथक मिळालेल्या बातमीचे ठिकाणी जावुन दबा धरुन थांबलेले असताना दादा उर्फ दाद्या घनवट हा त्याचे घराजवळ आला परंतु त्याला पोलीसांचा संशय आल्याने तो तेथुन पळ काढु लागला त्यास शोध पथकाने शिताफिने पकडुन ताब्यात घेवुन नाव व पत्ता विचारला असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली त्यास गुन्हे शाखा, युनिट ५ कार्यालय येथे आणुन त्याचेकडे सखोल तपास केला असता **दादा उर्फ दाद्या आण्णा घनवट, वय ३० वर्षे, रा भिमशक्ती नगर, ताम्हणेवस्ती, चिखली पुणे** असे असल्याचे सांगुन त्याने सांगितले की, तो स्वतः, संजय जाधव, सुनिल जमदाडे, विशाल मोरे व कैलास चौगुले यांचेसह आपले ताब्यामध्ये तलवार, कटावणी पक्कड, सायकलचे स्टँड इत्यादी सोबत ठेवून दोन मोटारसायकल वर चिखली गावामध्ये असलेल्या शांती कॉप्लेक्स समोरील सुभाष मोरे यांचे सुर्या इलेक्ट्रीकल समोर दरोडा घालण्याचे तयारीने आले असता तेथे अचानक पोलीस आल्याने ते सर्व कावरे बावरे झाले, त्याचेंमधील संजय जाधव, सुनिल जमदाडे व विशाल मोरे पोलीसांकडुन पकडले गेले तर कैलास व दादा यांनी तेथेन पळ काढला होता. सदर बाबत देहुरोड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४७/२०१३ भारतीय दंड विधान कलम ३९९, ४०२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्यास पुढील तपासकामी देहुरोड पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त मा.श्री संदिप बिष्णोई, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा.श्री सुधिर हिरेमठ, सहा पोलीस आयुक्त गुन्हे मा.श्री राजाराम पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.बाळकृष्ण सावंत, सहा पोलीस निरीक्षक श्री.राम गोमारे व पोलीस कर्मचारी धनराज किरनाळे, दत्तात्रय बनसुडे, सावन राठोड, संदिप ठाकरे, स्वामीनाथ जाधव, फारुक मुल्ला, नितिन बहिरट, भरत माने, राजकुमार इघारे, दयानंद खेडकर, श्यामसुदंर गुट्टे, ज्ञानेश्वर गाडेकर, धनंजय भोसले, गोपाळ ब्रम्हांदे, गणेश मालुसरे यांनी केली आहे.